महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र. रासाप्रपक/तंशिप्र- १२२२/प्र.क्र.०७/CAP/सुविधा केंद्र(FC)/परिपत्रक/२०२२/११८२, दिनांक : २१/०७/२०२२

## परिपत्रक

**विषय : तंत्रशिक्षण विभागांतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रे (FC) नोंदणीबाबत...**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षा व त्यावर आधारित केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात.

त्याअनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या तंत्रशिक्षण विभागामार्फत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता सन २०२०-२०२१ मध्ये केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेकरीता सुविधा केंद्रे (Facilitation Centre) नेमण्यात आली होती. केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही सुविधा केंद्रांबाबत विद्यार्थी-पालक यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील केंद्रिभुत प्रवेश प्रक्रिये दरम्यान सदर सुविधा केंद्र यांचेकडून अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होऊ नये याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विविक्षित सुविधा उपलब्ध असणारी सुविधा केंद्रे (Facilitation Centre) निवडण्यात येणार आहे.

त्याकरीता जी महाविद्यालये सुविधा केंद्रासाठी इच्छुक असतील त्यांच्याकरीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर दिनांक २१/०७/२०२२ ते ०५/०८/२०२२ या कालावधीत नोंदणीकरीता पोर्टल उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तरी ज्या संस्था इच्छुक असतील त्यांनी उपरोक्त कालावधीत *https://fcreg2022.mahacet.info/* पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी करताना त्यात भरलेली संपूर्ण माहिती योग्य व परिपूर्ण असल्याची खातरजमा करुन नोंदणी करण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पोर्टलवर नोंदणी केलेल्या महाविद्यालयांमधून विद्यार्थी-पालक यांचेकरीता सुविधा केंद्र (Facilitation Centre) उपलब्ध करुन देण्यासाठी महाविद्यालय निवडण्यात येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या सुविधा केंद्रांनी नियमानुसार प्रक्रियेचे काम योग्यरितीने पुर्ण करणे आवश्यक आहे. सुविधा केंद्रांकरीता मार्गदर्शक सूचना (FC Guidelines) सोबत जोडल्या आहेत.

सुविधा केंद्रांबाबत तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित महाविद्यालयावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-

**(रविंद्र जगताप) भा.प्र.से.**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**